# जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर
# खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
# नोंदनी क्रमांक – ई-3342/2017 दिनांक 27/11/2017

**आदेश क्र. जिखप्र/प्रमा - आरोग्य सेवा/............/2026**

**दिनांक : 23-03-2026**

## प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश

**विषय -** प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत “आरोग्य सेवा” या शिर्षकाखाली इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे सुचर मटेरिअल, स्टॅपलर तसेच सर्जिकल साहित्य खरेदी करणे या कामाला प्रशासकीय मान्यता व निधी वितरण.

**वाचा -**

1. भारत सरकार खाण मंत्रालय प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) यांचे मार्गदर्शक सूचना दिनांक 15/01/2024
2. महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे शासन निर्णय क्र. डीएमएफ-0124/ प्र.क्र. 10/उद्योग-9 मंत्रालय, मुंबई-32, दि. 11 ऑक्टोबर 2024
3. अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर यांचे पत्र क्र. इंगांशावैमवरुना/तां. मान्यता/जिखप्र/202526/22206/2025 दिनांक 20/08/2025
4. वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांचे पत्र क्रं. संकीर्ण-0624/प्र. क्र .268 /प्रशा -२ दिनांक 13/09/2025
5. अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर यांचे तांत्रिक मान्यता आदेश इंगांशावैमवरुना/तां. मान्यता/जिखप्र/202526/22205/2025 दिनांक 20/08/2025
6. मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे दिनांक........ /........../2026 रोजीच्या मंजुर टिपणीनूसार

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 3 च्या पत्रान्वये अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर यांनी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत “आरोग्य सेवा” या शिर्षकाखाली इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे सुचर मटेरिअल, स्टॅपलर तसेच सर्जिकल साहित्य खरेदी करणे या कामाकरीता अंदाजित रू. 4,01,70,622/- (अक्षरी रु. चार कोटी एक लक्ष सत्तर हजार सहाशे बाविस फक्त) चा प्रस्ताव या कार्यालयात सादर केलेला आहे. संदर्भ क्र. 4 नूसार दिनांक 13/09/2024 रोजीच्या शासन पत्रान्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)/ जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत औषधी, सर्जिकल साहित्य व तद्नुषंगीक बाबी खरेदीच्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता प्रदान करण्याचे अधिकार संबंधित संस्थेच्या अधिष्ठाता स्तरावर गठीत तज्ञ समितीला देण्यात आलेले असल्याबाबत नमुद आहे. यानुसार, संदर्भ क्र. 5 पत्रान्वये अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर यांनी उक्त कामाकरीता गठित करण्यात आलेल्या समितीद्वारे तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. त्यापैकी रू. 1,40,00,000/- (अक्षरी- रू. एक कोटी चाळिस लक्ष फक्त) इतक्या रकमेचे सुचर मटेरिअल, स्टॅपलर तसेच सर्जिकल साहित्य खरेदी करणेकरीता प्रस्तावित करण्यात येइल.

## नियोजित कामांचे विवरण

| अ.क्र | तालुका | कार्यान्वित यंत्रणा | कामाचे विवरण | प्रशासकीय मान्यता रक्कम | या आदेशान्वये वितरित करावयाचा 20% निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नागपूर (शहर) | अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर | ता. नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे सुचर मटेरिअल, स्टॅपलर तसेच सर्जिकल साहित्य खरेदी करणे | 14000000 | 2800000 | प्रत्यक्ष बाधित क्षेत्र (उच्च प्राथमिक बाबी) |
| एकुण | | | | 14000000 | 2800000 | |

